॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कर्मचारी कल्याण निधी अंतर्गत "जगा आनंदाने मृत्युनंतरही" आणि गुंतवणूकीतून आर्थिक कल्याण" या विषयावर चर्चासत्र शुक्रवार दि. ५ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आले.

यावेळी मंचावर कुलसचिव डॉ. विनोद पाटील, सीए अनिलकुमार शाह, श्री. नितीन राव व वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील उपस्थित होते. सीए. अनिलकुमार शाह यांनी विद्यापीठातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याशी "जगा आनंदाने मृत्युनंतरही" या विषयावर संवाद साधला. मृत्यु हा अटळ असल्याने घरातल्या कर्त्या पुरूष/महिलेने मृत्युपूर्वी कुंटूंबाला अडचणी येवू नये म्हणून विविध बँक खाते, मालमत्ता, व्यवसाय इतर धनसंपदा या संदर्भात योग्य त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून भविष्यातल्या अडचणी कमी कशा करता येईल याबाबत विवेचन केले.

या चर्चासत्राच्या दुस-या सत्रात गुंतवणूकीव्दारे आर्थिक कल्याण कसे करता येवू शकते या विषयावर मुंबई येथील ईप्सीलीन मनी मार्ट प्रा. लि. चे प्रमुख नितीन राव यांनी मार्गदर्शन केले. श्री. राव यांनी गुंतवणूक करतांना त्यात अपहार व फसवणूक होऊ नये यासाठी काय काळजी घ्यावी. आदी बाबींवर सविस्तर माहिती दिली. सुत्रसंचालन वृषाली ललवाणी यांनी केले.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. ५ (प्रतिनिधी) लिंगभाव संवेदनाशीलता ही संकल्पना दिसते तेवढी सोपी नाही. यात अनेक बारकावे आहेत ते समजून घेतल्याशिवाय स्त्री आणि पुरूष यांच्यातील जडण-घडण आणि त्यांची भूमिका आपल्याला समजून घेता येणार नाही. तसेच निसर्गत: स्त्री आणि पुरूष यांच्यामध्ये असलेली गुणवैशिष्ट्ये स्वीकारून आपल्याला त्यांच्यात समानता प्रस्थापित करून लिंगभाव संवेदनशीलता रूजवता येणार नाही असे प्रतिपादन प्रा. मुक्ता महाजन यांनी केले.

भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राच्या संचालिका प्रा. मुक्ता महाजन यांनी लिंगभाव संवेदनशीलता" या विषयावर कार्यशाळेत मार्गदर्शन केले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेत शिक्षणशास्त्र, विद्यार्थी विकास विभाग आणि क्षमता निर्माण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "आत्मनिर्भर युवती अभियान" राबविण्यात येत आहे.

या कार्यशाळेच्या दुस-या सत्रात सायबर गुन्हे शाखेतील पोलीस नाईक श्री. सचिन सोनवणे यांनी "सायबर विश्वातील गुन्हे आणि महिलांची सुरक्षा" या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. श्री. सोनवणे म्हणाले की, ऑनलाईन माध्यमातून विविध समाज माध्यमे वापरत असतांना कोणती काळजी घेतली पाहिजे व आपल्या वैयक्तिक माहितीचा गैरप्रकार होऊ नये या सुरक्षेसाठी कोणती उपाय केले पाहिजे तसेच आपण कोणत्याही प्रकारच्या ऑनलाईन गुन्ह्यात अडकणार नाही किंवा आपली ऑनलाईन पध्दतीने आर्थिक फसवणूक होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. या संदर्भात त्यांनी सायबर गुन्हे शाखेत दाखल झालेल्या विविध तक्रारींची उदाहरणे देवून सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी प्रशाळेच्या संचालक डॉ. मनीषा इंदाणी, डॉ. संतोष खिराडे, डॉ. स्वाती तायडे, समन्वयक डॉ. रणजित पारधे, सह-समन्वयक प्रणाली सोनवणे यांच्यासह ४० विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

..............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ५ जानेवारी, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता